# अल्ट्रा मिडिया तर्फे स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव उत्साहाने साजरा



महानगरी । प्रतिनिधी

मुंबई : अल्ट्रा मिडिया या मनोरंजन क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेच्या कार्यालयात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. संस्थेतील उत्साही कर्मचारी व अधिकारी यानी यानिमित्ताने जुन्या जमान्यातील हिंदी व मराठी देशभक्तीपर गीते सादर केली. राष्ट्रध्वजाचाबाबत सर्वसामान्य नागरिकांनी काय काळजी घ्यावी याची माहिती दिली. ध्वजाबाबतीतली संहिता व त्यानंतर त्याची जपणूक याची माहिती देण्यात आली. आगामी २५ वर्षे जगातील एक बलवान व विकसित देश म्हणून भारताची आगेकूच कशा प्रकारे सुरु राहणार याबाबत ज्येष्ठ संचालक विवेक कोटियन यांनी आपले विचार मांडले .